टिप्पणी

स्थानिक लोकांना रोजगार शाखा
उद्योग संचालनालय

औद्योगिक विकासातून होणा-या आर्थिक फायद्यामध्ये स्थानिक लोकांना योग्य हिस्सा मिळावा तसेच स्थानिक लोकांचा बेरोजगार कमी व्हावा या दृष्टीकोनातून स्थानिक लोकांना नोक-यांमध्ये प्राधान्य देण्याचे धोरण शासनाने अवलंबिले आहे. औद्योगिक विकासात स्थानिक लोकांना वाढत्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला की, सामाजिक ताण कमी होईल आणि राष्ट्रीय एकात्मता व देशाच्या आर्थिक विकासाला परिपोषक असे वातावरण निर्माण होईल असे शासनाचे धोरण आहे. या दृष्टीकोनातून स्थानिक लोकांना नोक-यांमध्ये प्राधान्य देण्यात यावे असे धोरण उद्योग,उर्जा व कामगार विभाग निर्णय क्रमांक आयएसटी-१०७२/१३४९१ -आयएनडी - ३,दि. १३ फेब्रुवारी, १९७३ नुसार अवलंबिलेले आहे.

२. उपरोक्त धोरणानुसार स्थानिक व्यक्ति म्हणजे “महाराष्ट्रात कमीत कमी १५ वर्षे अधिवास असलेली व्यक्ति ” अशी व्याख्या केली आहे. औद्योगिक घटकांमध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० टक्के व पर्यवेक्षकीयसहित इतर श्रेणीत किमान ८० टक्के नोकर स्थानिक असावेत असे शासनाचे धोरण आहे. औद्योगिक घटकांमध्ये नोकरभरती करणारा अधिकारी शक्य तो स्थानिक इसम असावा त्यास मराठीचे ज्ञान असावे हे या धोरणात अपेक्षित आहे. हे धोरण कार्यान्वित करण्यासाठी उद्योजकांवर संवैधानिक बंधने घातली नाहीत, तरी उद्योजकांना सातत्याने प्रभावित करुन या धोरणाचा अवलंब करण्यासाठी पाठपुरावा केला आहे. त्यासाठी शासनाने उद्योग संचालनालयामध्ये सन १९७३ पासून “ स्थानिक लोकांना रोजगार ” कक्ष स्थापन केला आहे. तसेच नोंदणी झालेल्या सर्व लघु उद्योगाबाबत राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

३. राज्याच्या निरनिराळया विभागाच्या तुलनात्मक शक्तिस्थानाचा पुरेपुर उपयोग करुन संतुलित विभागीय विकास साधण्याचा प्रयत्न सुचविण्यांत आला आहे. यामुळे राज्याच्या विकसनशील विभागामध्ये रोजगारांच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत. या धोरणामुळे होणा-या औद्योगिक विकासाच्या फायद्यामध्ये स्थानिक जनतेला योग्य वाटा मिळावा असा शासनाचा सातत्याने प्रयत्न राहणार आहे. त्यासाठी स्थानिक व्यक्तींना प्राधान्याने रोजगार उपलब्ध होतो किंवा नाही यावर जिल्हा उद्योग केंद्रांमार्फत लक्ष पुरविले जाईल असे शासनाने नवीन औद्योगिक धोरणामध्ये नमूद केले आहे. स्थानिक लोाकांना नोक-यांसंबंधी विधानमंडळात ठराव, अनियतदिन प्रस्ताव, लक्षवेधी सूचना याद्वारे लोक प्रतिनिधी या धोरणाच्या अंमलबजावणीबाबत शासनाचे लक्ष वेधित आहेत. त्यामुळे सदरची योजना जास्त परिणामकारकरित्या राबवावी लागणार आहे.

४. उद्योग संचालनालयामार्फत स्थानिक लोकांना रोजगार यासंबंधी माहिती स्थालोरो प्रपत्र -१ व प्रपत्र-२ या दोन नमुन्यात संकलित केली जाते तसेच या धोरणाची अंमलबावणी करण्यासाठी औद्योगिक घटकांशी आवाहनात्मक पत्रव्यवहार केला जातो व या संदर्भातील अहवाल शासनास सादर करण्यांत

येतो. नवीन औद्योगिक धोरणानुसार स्थानिक लोकांना प्राधान्याने औद्योगिक घटकात रोजगार उपलब्ध होतो किंवा नाही यावर जिल्हा उद्योग केंद्रांमार्फत कटाक्षाने लक्ष पुरवावे असा शासनाचा आदेश आहे.

५. स्थानिक लोकांना रोजगारांत प्राधान्य हे धोरण राबविण्यासाठी उद्योग संचालनालयातील स्थानिक लोकांना रोजगार कक्ष, जमीन शाखा, ना हरकत प्रमाण पत्र शाखा, अनुज्ञप्ती शाखा, बृहन्मुंबई प्राधिकरण विभाग कार्यालय व राज्यातील एकूण ३३ जिल्हा उद्योग केंद्र कार्यालये, यांचे सहकार्याने उद्योग संचालनालयाकडे सहाय्यासाठी येणा-या नियोजित उद्योग घटकांकडून स्थानिक लोकांना रोजगार देण्याबद्दलचे प्रपत्र-२ भरुन घेऊन घटकांत किमान ८० टक्के स्थानिक लोकांना रोजगार देण्याबाबत विनंती करण्यात येते. तसेच कार्यरत असलेल्या औद्योगिक घटकांना स्थानिक लोकांचे प्रमाण पडताळून त्याबाबतची माहिती प्रपत्र-१ मध्ये संकलित केली जाते. कार्यरत घटकांमध्ये ८० टक्केंपेक्षा स्थानिक लोकांचे प्रमाण कमी आढळल्यास पुढील भरतीच्या वेळेस स्थानिक लोकांना प्राधान्य देण्याबाबत विनंती करण्यात येते व वेळोवेळी पत्र व्यवहार करुन स्थानिक लोकाना रोजगार देण्याबाबत आवाहन करण्यात येते. अशा पकारे टक्केवारी भरुन काढण्यासाठी पाठपुरावा करण्यात येतो. स्था.लो.रो. प्रपत्र-१ व प्रपत्र-२ चे नमुने सोबत जोडण्यात आले आहेत.

६. शासनाने राज्यातील Human Development Index कमी असलेल्या दहा जिल्हयांमध्ये नव्याने स्थापन होणा-या घटकांना रोजगारावर अवलंबून सवलती देण्याचे ठरविले आहे.

त्याप्रमाणे शासनाने नमूद केलेल्या १० जिल्हयांमध्ये नव्याने घटक स्थापणा-या आणि ७५%स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करुन देणा-या घटकांना त्यांचे ESI & EPF मधील ७५% रक्कम घटकांना वार्षिकरित्या परत देण्यात येणार आहे व ही योजना ५ वर्षांसाठी लागू आहे. हे दहा जिल्हे पुढीलप्रमाणे आहेत.

गडचिरोली, यवतमाळ, जालना,नंदूरबार,वाशिम,धुळे, नांदेड, उस्मानाबाद, बुलढाणा, चंद्रपूर,

**उद्योग संचालनालय**
**महाराष्ट्र शासन, मुंबई**

**इएलपी-१**

## *स्थानिक लोकांची नोकरभरती करण्याविषयीच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना
## **अस्तित्वात असलेल्या उद्योग उपक्रमांनी अंमलबजावणी करावयाचे

संकेतांक***

१. औद्योगिक उपक्रमांचे नांव ................................

२. पत्ता कार्यालय कारखाना
गांव/शहर
तहसील.................
.......................................................
जिल्हा ............................................ ............

३. प्रमुख उत्पादने........................................................

४. स्थापनेचे वर्ष............................

५. मालकी खालीलपैकी कोणत्या प्रकारातील:-
(१) केंद्र सरकार
(२) राज्य सरकार
(३) सहकारी संस्था
(४) सार्वजनिक मर्यादित
(५) खाजगी मर्यादित
(६) व्यक्तिगत मर्यादित
(७) भागीदारी
(८) इतर

६. माझ्या/आमच्या औद्योगिक उपक्रमामध्ये नोकरभरती करण्याचा अधिकार....... असलेली व्यक्ती/ प्रशासकीय आस्थापना अधिकारी ही मराठी जाणणारी/ न जाणणारी स्थानिक/ स्थानिक नसणारी व्यक्ती आहे.

७. कारखाना अधिनियमाखाली नोंदणी झाली आहे काय ? होय/नाही

८. खालील प्रकारात नोंदणी झाली आहे का?
(अ) मोठे उद्योग .. .. ..
(ब) मध्यम उद्योग .. .. ..
(क) लघु उद्योग .. ..

---

*स्थानिक व्यक्ती याचा अर्थ ज्यांचे वास्तव्य कमीत कमी १५ वर्षे महाराष्ट्रात आहे अशी व्यक्ती

**औद्योगिक उपक्रमाने ज्या व्यक्तीस सदरचे अधिकार प्रदान केले असतील अशा व्यक्तीनेच या प्रतिज्ञापत्रावर सही करावयाची आहे.

***आयताकृती जागेमध्ये संकेतांक देणेचे असून सदर जागा औद्योगिक उपक्रमांनी भरावयाच्या नाहीत.

९. माझ्या / आमच्या औद्योगिक उपक्रमामध्ये सध्या माहे १९ अखेर सेवायोजनेचे स्वरुप:

| बाब | व्यवस्थापनाव्यतिरिक्त | | |
|---|---|---|---|
| | पर्यवेक्षकीय | इतर | एकूण |
| १. सध्याचे स्वरुप- | | | |
| (अ) एकूण नोकर | | | |
| (ब) त्यातील स्थानिक व्यक्तींची संख्या | | | |
| (क) एकूण बरोबर स्थानिक व्यक्तींची टक्केवारी | | | |
| २. सन १९ मधील सेवायोजनस्थिती - | | | |
| (अ) एकूण नोकर | | | |
| (ब) त्यातील स्थानिक व्यक्तींची संख्या | | | |
| (क) एकूण बरोबर स्थानिक व्यक्तींची टक्केवारी | | | |

१०. पर्यवेक्षकीय सह व्यवस्थापनाव्यतिरिक्त प्रकारातील स्थानिक लोकांची टक्केवारी ८० टक्क्यांहून कमी नसावी व फक्त पर्यवेक्षकीय प्रकारातील स्थानिक लोकांचे प्रमाण ५० टक्क्यांहून कमी नसावे. याची मला/ आम्हाला जाणीव आहे. तथापि माझ्या / आमच्या कारखान्यात खालील प्रकारामधील नोकरांची टक्केवारी विहित प्रमाणात नाही :-

(१) पर्यवेक्षकीय .. .. ..

(२) व्यवस्थापनाव्यतिरिक्त .. .. .. एकूण

म्हणून मी/ आम्ही असे वचन देत आहोत की, भविष्यकाळामध्ये सर्वसाधारण कारणामुळे अगर विस्तार कार्यक्रमामुळे / विविधता आणण्याच्या कार्यक्रमामुळे नोकरभरती करावयाची झाल्यास व्यवस्थापनाव्यतिरिक्त ज्या प्रकारामध्ये विहित टक्केवारी कमी आहे त्यामध्ये ९० टक्के स्थानिक लोकांची भरती करण्यांत येईल. जेणेकरुन जरुर ती टक्केवारी पूर्ण होईल. त्यानंतर त्या प्रकारातील नोकरांचे प्रमाण विहित टक्केवारीइतके राखण्यात येईल.

११. मी / आम्ही असे लिहून देतो की, आमच्या औद्योगिक घटकात नोकर भरती करताना उमेदवारांचे जन्मस्थळ, मातृभाषा, शिक्षण अथवा प्रशिक्षण कोणत्या ठिकाणी झाले इत्यादी तपशील पडताळून पाहून तो उमेदवार स्थानिक असल्याची खात्री त्याच्या नियुक्तीच्या वेळी करुन घेईन. ज्या उमेदवाराकडे ही माहिती उपलब्ध नसेल किंवा कागदोपत्री पुरावा तो सादर करु शकणार नाही, त्याच्या बाबतीत महसूल अधिका-यांचा उमेदवार स्थानिक असल्याबाबतचा पुरावा मागून घेईन.

१२. मी / आम्ही असे लिहून देतो की, सध्याच्या आस्थापना अधिकारी / नोकरभरती करणारे अधिकारी याच्या जागी मराठी जाणणा-या स्थानिक व्यक्तीची नेमणूक करण्यांत येईल.

ठिकाण : संचालक / व्यवस्थापकीय संचालक/

दिनांक : प्रमुख व्यवस्थापक यांची स्वाक्षरी

---

*सध्याचे अधिकारी मराठी जाणणारे स्थानिक व्यक्ती असतील तर हे लागू नाही.

## स्था लो रो -२

सेवायोजनमध्ये स्थानिक लोकांना घेण्याबाबतच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना.
(नवीन औद्योगिक उपक्रमांनी भरावयाचा )

औद्योगिक उपक्रमाचे नांव :
मुख्य प्रवर्तकाचे नांव :
पत्ता : कार्यालय: -----------------------------------
-----------------------------------
-----------------------------------
-----------------------------------
कारखान्याच्या नियोजित जागेचा पत्ता: -----------------------------------

१. मी / आम्ही असे वचन देत आहोत की माझ्या / आमच्या नवीन औद्योगिक उपक्रमांमध्ये पर्यवेक्षकीयसह व्यवस्थापनेतर नोकरीपैकी किमान ८० टक्के स्थानिक लोकांची भरती करण्यांत येईल व केवळ पर्यवेक्षकीय नोकरांमध्ये किमान ५० टक्के स्थानिक लोक घेण्यात येतील.

२. मी / आम्ही असे वचन देतो की आमच्या नियोजित औद्योगिक उपक्रमामध्ये प्रशासकीय आस्थापना अधिकारी / नोकरभरती करण्यासाठी नेमलेले अधिकारी हे केवळ मराठी जाणणारे स्थानिक व्यक्तीच असतील.

३. मी / आम्ही असे लिहून देतो की, औद्योगिक उपक्रमात नोकर भरती करताना उमेदवाराचे जन्मस्थळ, मातृभाषा, शिक्षण अथवा प्रशिक्षण कोणत्या ठिकाणी झाले इत्यादी तपशिल पडताळून पाहून तो उमेदवार स्थानिक असल्याची खात्री त्याच्या नियुक्तीच्या वेळी करुन घेईन / घेऊ. ज्या उमेदवाराकडे ही माहिती उपलब्ध नसेल किंवा कागदोपत्री पुरावा तो सादर करु शकत नाही त्याच्या बाबतीत महसूल अधिका-याचा उमेदवार स्थानिक असल्याबाबतचा दाखला मागून घेऊ / घेईन.

ठिकाण :

दिनांक :

संचालक / व्यवस्थापकीय संचालक /
प्रमुख व्यवस्थापक / मालक यांची स्वाक्षरी.

---

*स्थानिक व्यक्ती याचा अर्थ ज्याचे किमान १५ वर्षे महाराष्ट्र राज्यात वास्तव्य आहे अशी व्यक्ती.
**नवीन औद्योगिक उपक्रमाने ज्यांना स्वाक्षरी करण्याचे अधिकार प्रदान केले असतील त्यांनीच या प्रतिज्ञापत्रावर सही करणेची आहे.